# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई.

जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.

दूरध्वनी क्र.०२२/२३६३००८१/८६ फॅक्स क्र.२३६३००९०

ई-मेल-dd.mumbai@mahedu.gov.in, dydemumbai@yahoo.com


---

**शाळा परवानगी आदेश.**

जा.क्र.शिउसं/माध्य-३/स्वअशा/प्र.क्र.९५/२०१८/ 23६५४

दिनांक :- 26 OCT 2018

प्रति,

सचिव/अध्यक्ष,

सेवेन इलेवन एज्युकेशन सोसायटी, बी.पी.रोड, भाईंदर

**विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम,२०१२ अंतर्गत शाळांना परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-१०१८/प्र.क्र.११३४/एसएम-२, दि.१८.०९.२०१८.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय शासन निर्णयानुसार महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, सन **२०१८-१९** या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर **नवीन शाळा** सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नावं व पत्ता | शाळेचे नावं व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| सेवेन इलेवन एज्युकेशन सोसायटी, बी.पी.रोड, भाईंदर | सेवेन स्क्वेअर अॅकॅडमी, प्लॉट रोसा गार्डनच्या पुढे विहंग व्हॅलीच्या समोर, ओवला, माजिवाडा,ठाणे | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक (इ.१ ली ते ०५ वी) | इंग्रजी |

शासन निर्णय दिनांक १८.०९.२०१८ मधील अटी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी तसेच खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. प्रत्येक प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील नियम ११ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांना या कार्यालयाकडून प्रथम मान्यता घेण्यात यावी.

२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ नुसार देण्यात आलेली परवानगी अशी परवानगी मिळाल्यापासून १८ महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

३. सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर "स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन/दर्जावाढ प्राप्त शाळा" असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

...२/-

५. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ दिनांक २१ मार्च, २०१४ व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ दिनांक १३ एप्रिल, २०१६ मधील अटी व शर्तींची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहील.

६. स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी / शासनास पत्रव्यवहार करताना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा/दर्जावाढ अशा प्रकारचे लेटर हेड वापरणे आवश्यक आहे.

७. सदर शाळांनी शासनाच्या/शिक्षण विभागाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधनियिम, २०१२ मधील कलम ४ (१) अंतर्गत तरतुदीनुसार अनुसूची "ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणत्याही बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल. तथापि, इरादा पत्र देण्यात येण्यापूर्वी, उक्त रक्कम ही दाननिधी निर्माण करण्यासाठीची प्रतिभूती ठेव म्हणून व्यवस्थापन आणि संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरीत्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवण्यात येईल, असे प्रमाणपत्र किंवा ठेव संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे तारण म्हणून ठेवण्यात येईल, असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव नुतनीकरणाच्या अटीच्या अधिनतेने, किमान तीन वर्षाच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल.

९. सदर शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करणे तसेच मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीस शैक्षणिक अर्हतेनुसार संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील.

१०. कर्मचारी संच संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांचेकडून मंजूर करून घ्यावा.

११. शाळेचे हिशेब व सर्व प्रकारच्या नोंदवह्या अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

१२. शासन आदेशातील तरतुदीनुसार शिक्षक – पालक संघटनेची स्थापना करणे आवश्यक आहे.

१३. मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असणे आवश्यक आहे.

१४. विशेषत: अग्निरोध संदर्भातील सुरक्षेबाबत योग्य ती कार्यवाही, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व व्यवस्था व अग्निपासून कुठल्याही दुर्घटना होऊ नये, याबाबत प्रतिबंधात्मक दक्षता घेणे बंधनकारक राहील.

१५. शासन निर्णय क्र. संकिर्ण २००९/(९१६/०९)/माशि-१, दिनांक ३ नोव्हेंबर, २००९ मधील तरतुदीनुसार शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्याकडून शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ०३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४.
३. मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, शिक्षक भवन, १९२, नवीपेठ, निवारा वृध्दाश्रमाजवळ, गांजवे चौक, पुणे-४११ ०३०.

**प्रत** :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त शाळेच्या मान्यतेबाबत त्यांचे स्तरावरून उचित कार्यवाही करावी.